

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ४९ • शुक्रवार दि.१३ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

नांदेडमध्ये पाकिस्तानी बनावट सौंदर्यप्रसाधनांचा विषारी खेळ!

सरकारी प्रयोगशाळेच्या अहवालाने खळबळ;इतवारा पोलीस आणि एफडीएची संयुक्त कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील इतवारा भागातील अफरा कलेक्शन या दुकानावर इतवारा पोलीस आणि अन्न व औषध प्रशासन (एफडीए)च्या पथकाने दि.९ जुलै रोजी टाकलेल्या छाप्यामध्ये मेड इन पाकिस्तान लेबल असलेला तब्बल ४० लाखांचा सौंदर्यप्रसाधनांचा मोठा साठा जप्त केला होता. या सौंदर्यप्रसाधनांचे नमुने तपासणीसाठी शासकीय प्रयोगशाळेत पाठवले होते. प्रयोगशाळा (फॉरेन्सीक लॅब) च्या अहवालानुसार या जप्त केलेल्या प्रसाधनांमध्ये शरीरासाठी अत्यंत घातक असलेल्या रासायणीक घटक मोठ्या प्रमाणात वापरले गेल्याचा अहवाल प्रयोगशाळेने दिला आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

नांदेड शहरात अवैधरीत्या विक्रीस ठेवण्यात आलेल्या मेड इन पाकिस्तान असे लेबल असलेल्या बनावट सौंदर्यप्रसाधनांच्या साठ्यावर इतवारा पोलिसांनी ९ जुलै रोजी छापा टाकला होता. या कारवाईत तब्बल ३९ लाख ६९ हजार ९४० रुपये किमतीचा सौंदर्यप्रसाधनांचा साठा जप्त करण्यात आला होता. आता या जप्त केलेल्या साहित्याचे नमुने शासकीय विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते.या तपासणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सौंदर्यप्रसाधनां-मधील विषारी घटकांचे भयावह वास्तव उघड झाले आहे.

४८ हजार पट अधिक पाऱ्याचे प्रमाण!

शासकीय प्रयोगशाळेच्या अहवालानुसार, पार्ले क्रीट गोल्ड ग्लिम ब्युटी क्रीम या क्रीममध्ये पाऱ्याचे प्रमाण तब्बल ४८ हजार ४५३.४४ पीपीएम आढळले आहे. सौंदर्यप्रसाधनांच्या नियमांनुसार पाऱ्याची कमाल निर्धारित मर्यादा १ पीपीएम असताना या क्रीममध्ये त्याचे प्रमाण मर्यादेपेक्षा तब्बल ४८ हजार पट अधिक असल्याचे निष्पन्न झाले आहे. ही बाब केवळ नियमांचे उल्लंघन करणारी नसून ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे. त्याचप्रमाणे गोरी ब्युटी क्रीम विथ लाइकोपीन या क्रीममध्येही पाऱ्याचे प्रमाण ६ हजार ९२४.९४ पीपीएम आढळले आहे. म्हणजेच निर्धारित मर्यादेपेक्षा जवळपास सात हजार पट अधिक पारा या उत्पादनात असल्याचे प्रयोगशाळेच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. याशिवाय जप्त करण्यात आलेल्या सौंदर्यप्रसाधनांमध्ये आर्सेनिक या विषारी धातूचेही घटक आढळल्याचे पोलीस प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

इतवारा पोलिसांची मोठी कारवाई

पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली इतवारा पोलीस ठाण्याच्या पथकाने अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसमवेत ९ जुलै रोजी ममदार गल्ली, बाफना चौक, इतवारा परिसरातील 'मे. अफरा कलेक्शन (अफराह टूर्स अँड ट्रॅव्हल्स)' या दुकानावर छापा टाकला होता. यावेळी दुकानचालक मोहम्मद जियाउद्दीन मोहम्मद वाजिद (वय २५, रा. ममदार गल्ली, सध्या हैदरबाग, देगलूर नाका, नांदेड) याच्याकडून विविध ब्रँडची मेड इन पाकिस्तान असे उर्दू व इंग्रजी भाषेतील लेबल असलेली सौंदर्यप्रसाधने जप्त करण्यात आली होती. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २४२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १२३, ३१८(४), औषधे व सौंदर्यप्रसाधने अधिनियमातील कलम १८(सी), २७(२)(बी) तसेच विदेशी व्यापार अधिनियमातील संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गोरेपणाच्या हव्यासापोटी आरोग्य धोक्यात!

पारा आणि आर्सेनिकसारख्या विषारी घटकांचा शरीरावर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्वचेच्या माध्यमातून शरीरात शोषले जाणारे हे घटक त्वचारोग, मूत्रपिंड निकामी होणे आणि मज्जासंस्थेवर विपरीत परिणाम होण्यास कारणीभूत ठरू शकतात, असा इशारा पोलिसांनी दिला आहे. त्यामुळे आकर्षक पॅकिंग, परदेशी ब्रँडचे लेबल आणि गोरेपणाच्या जाहिरातींना भुलून अशी उत्पादने वापरणे धोकादायक ठरू शकते.

नांदेड जिल्हा पोलीस दलाने नागरिकांना सौंदर्यप्रसाधने खरेदी करताना उत्पादकाचे अधिकृत लेबल, उत्पादन परवाना क्रमांक आणि उत्पादनाचा दर्जा तपासण्याचे आवाहन केले आहे. अवैध, विनापरवाना किंवा बनावट विदेशी वस्तूंची विक्री आढळल्यास जवळच्या पोलीस ठाण्यात, पोलीस नियंत्रण कक्षाच्या ०२४६२-२३४७२० या क्रमांकावर अथवा डायल ११२ वर माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सौंदर्याच्या बाजारपेठेत गोरेपणाचे आमिष दाखवून ग्राहकांना आकर्षित केले जाते; मात्र त्या उत्पादनांमध्ये नेमके काय मिसळले आहे, याची खातरजमा करण्याची यंत्रणा किती प्रभावी आहे, हा प्रश्न या प्रकरणामुळे ऐरणीवर आला आहे. लाखो रुपयांचा बनावट साठा जप्त होऊन त्यातील विषारी घटक उघड झाल्याने अशा उत्पादनांच्या विक्रीविरोधात केवळ छाप्यांपुरती नव्हे, तर राज्यभर कठोर कारवाई होण्याची गरज निर्माण झाली आहे.

नांदेडमध्ये दोन ठिकाणी घरफोड्या;सव्वादोन लाखांचा ऐवज लंपास

महबुबिया कॉलनी,वर्धमाननगरमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ;सात आरोपींवर कारवाई

नांदेड/प्रतिनिधी- शहरात घरफोडी आणि लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र समोर आले आहे. नांदेड शहरातील महबुबिया कॉलनी आणि मालेगाव रोडवरील वर्धमाननगर येथे अज्ञात चोरट्यांनी बंद घरांचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा लाखोंचा ऐवज लंपास केला. या दोन्ही घटनांमध्ये एकूण २ लाख ३६ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. दरम्यान, कामठा खुर्द रस्त्यावर मोटारसायकलला कट मारल्याच्या कारणावरून एका तरुणाला मारहाण करून त्याच्याकडील रोकड आणि मोबाईल चार्जर हिसकावून नेल्याची घटनाही उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलीसांनी सात आरोपींवर कारवाई केली आहे.

मालेगाव रोडवरील वर्धमाननगर परिसरात घडली. ९ ते १२ नोव्हेंबर दरम्यान अज्ञात चोरट्यांनी फिर्यादी आणि साक्षीदारांच्या घरांचे कुलूप व कोंडा तोडून आत प्रवेश केला. कपाट आणि लोखंडी पेटीतील सोन्या-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम असा एकूण १ लाख ९५ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. याप्रकरणी सुनील विठ्ठलराव पाटील (वय ३०, रा. वर्धमाननगर) यांच्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक वाडीवाले करीत आहेत. नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महबुबिया कॉलनी येथे घरफोडीची घटना घडली. ११ ते १३ नोव्हेंबरच्या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी फिर्यादी शेख सुजाज हसनसाब (वय ४६) यांच्या राहत्या घराचे कुलूप व कोंडा तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल तेलंगे करीत आहेत. धनेगाव ते कामठा जाणाऱ्या रस्त्यावर कामठा खुर्द परिसरात लुटमारीची घटना घडली. मोटारसायकलला कट का मारला, असा जाब विचारण्याच्या कारणावरून सात जणांनी संगनमत करून फिर्यादी तरुणाला शिवीगाळ व थापडाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर त्याच्याकडील १५ हजार रुपये रोख *पान ४ वर*



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दिवाळीनिमित्त नागपूर येथील शासकीय निवासस्थान रामगिरी बंगला येथे भेट घेवून शुभेच्छा देतांना भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी विरोधी पक्षनेता महेश (बाळू) खोमणे व नगरसेविका सुदर्शना महेश खोमणे दिसत आहेत.

राहुल गांधींचा मोदी सरकारवर फोन टॅपिंगचा आरोप;नाना पटोलेंचाही दावा!

नवी दिल्ली : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर आपला फोन टॅप केल्याचा गंभीर आरोप केला आहे. शुक्रवार दि.१३ नोव्हेंबर रोजी समाज माध्यमांवर व्हिडीओ प्रसिद्ध करत त्यांनी हा दावा केला. विशेष म्हणजे, काँग्रेस नेते नाना पटोले यांनीही आपला फोन टॅप करण्यात आल्याचा आरोप केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

केंद्रातील भाजप सरकार आणि काँग्रेस यांच्यातील राजकीय संघर्ष पुन्हा एकदा तीव्र झाला आहे. राहुल गांधी यांनी आपल्या फोनमध्ये परकीय शक्तींच्या सांगण्यावरून कोण काम करत आहे आणि देशविरोधी कारवायांमध्ये कोण सहभागी आहे, याची माहिती असल्याचा दावा केला. या मुद्द्यावर त्यांनी पंतप्रधान मोदींना समोरासमोर जाहीर चर्चेचे आव्हान दिले. भाजप संसदेत चर्चा करण्याची तयारी दर्शवत असला, तरी संसदेत आपल्याला बोलू दिले जात नाही आणि मायक्रोफोन बंद केला जातो, असा आरोपही त्यांनी केला. कृषी विधेयके, मतचोरी, मतदार यादीतील विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर), चीन, नरवणे यांचे पुस्तक आणि एपस्टीन यांसारख्या विषयांवर आपल्याला बोलण्याची संधी मिळाली नसल्याचे राहुल गांधी म्हणाले. मला लांबलचक भाषणे नकोत, तर पंतप्रधानांशी थेट समोरासमोर चर्चा हवी आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली. दरम्यान, दुसऱ्या व्हिडीओत राहुल गांधी यांनी चर्चेसाठी अदाणी समूहाचे अध्यक्ष गौतम अदाणी किंवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना परीक्षक म्हणून नियुक्त केले तरी आपली हरकत नसल्याचे म्हटले. पंतप्रधान देशद्रोही आहेत, हे सिद्ध करण्यासाठी आपल्याला केवळ पाच मिनिटे पुरेशी असल्याचा आक्रमक दावाही त्यांनी केला. राहुल गांधी यांच्यापाठोपाठ नाना पटोले *पान ४ वर*

शेतकऱ्यांची पीक कर्जासाठी बँकांकडे फरफट!

नव्या कर्जासाठी दीड ते दोन महिने प्रतीक्षा;बँकांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद तालुक्यात एकीकडे दुष्काळाच्या झळा, शेतीचा वाढता खर्च आणि आर्थिक अडचणींमुळे शेतकरी मेटाकुटीला आला असताना दुसरीकडे नवीन पीक कर्ज मिळवण्यासाठी बँकांचे उंबरठे झिजवावे लागत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आता पीक कर्जासाठीही प्रतीक्षेचा सामना करावा लागत असल्याने शेतकरी वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे.

नवीन पीक कर्जासंदर्भात माहिती घेण्यासाठी किंवा अर्जाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी बँकेत जाणाऱ्या काही शेतकऱ्यांना संबंधित कर्मचाऱ्यांकडून दीड ते दोन महिन्यांनी पुन्हा या, असे तोंडी सांगितले जात असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे बियाणे, खते, कीटकनाशके तसेच शेतीच्या इतर आवश्यक खर्चासाठी आर्थिक तरतूद करताना शेतकऱ्यांची मोठी अडचण होत आहे. शेतीसाठी कर्जाची माहिती घेणे, अर्जाची स्थिती विचारणे आणि कर्ज प्रक्रियेबाबत मार्गदर्शन मागणे हा शेतकऱ्यांचा अधिकार आहे. त्यामुळे बँकेत येणाऱ्या शेतकऱ्यांना सन्मानपूर्वक वागणूक देणे, त्यांच्या प्रश्नांना स्पष्ट उत्तरे देणे आणि आवश्यक कागदपत्रांबाबत योग्य मार्गदर्शन करणे ही बँक कर्मचाऱ्यांची जबाबदारी आहे. काही बँकांमध्ये शेतकऱ्यांना समाधानकारक सेवा मिळत असताना काही ठिकाणी मात्र वेगळाच अनुभव का येत आहे, याचा संबंधित बँकांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने आढावा घेण्याची गरज आहे. अशा परिस्थितीत पीक कर्जासाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागल्यास त्याचा थेट परिणाम शेतीच्या कामांवर आणि उत्पादनावर होण्याची शक्यता आहे. प्रशासन आणि बँकांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे. नवीन पीक कर्जासाठी अर्ज करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांच्या प्रकरणांचा लागू नियमांनुसार वेळेत निपटारा करावा, कर्ज प्रक्रियेतील विलंबाची कारणे स्पष्ट करावीत आणि शेतकऱ्यांना विनाकारण बँकेच्या चकरा मारण्याची वेळ येऊ देऊ नये, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या हालचालींना वेग

पार्थ पवारांची निवडक आमदारांशी चर्चा,अदिती तटकरे मुंबईकडे



मुंबई/प्रतिनिधी- महाराष्ट्राच्या राजकारणात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या विलीनीकरणाच्या चर्चांनी पुन्हा जोर धरला आहे. शुक्रवारी (१३ नोव्हेंबर) पुण्यात पार्थ पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या निवडक आमदारांनी सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले. त्याचवेळी महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी नंदुरबारचा दौरा अर्धवट सोडून मुंबईकडे प्रयाण केल्याने या घडामोडींना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. दुसरीकडे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी विलीनीकरणाच्या मुद्द्यावर दोन्ही बाजूंनी एकत्रित निर्णय घेण्याची भूमिका मांडली आहे.

पुण्यातील जिजाई बंगल्यावर पार्थ पवार यांच्या उपस्थितीत आमदार माऊली कटके, शंकर मांडेकर आणि चेतन तुपे यांची सुनेत्रा पवार यांच्याशी भेट झाली. विशेष म्हणजे, या भेटीसाठी ठराविक आमदारांनाच बोलावण्यात आल्याने बैठकीच्या उद्देशाबाबत विविध तर्क लढविले जात होते. मात्र, भेटीनंतर आमदारांनी ही विलीनीकरणासंदर्भातील बैठक नसून दिवाळीच्या निमित्ताने घेतलेली सदिच्छा भेट असल्याचे स्पष्ट केले.

आमदार शंकर मांडेकर यांनी सांगितले की, दरवर्षी दिवाळी पाडव्याला अजितदादांची भेट घेण्यासाठी बारामतीला जात होतो. यंदा अजितदादा नसल्यामुळे सुनेत्रा वहिनींची भेट घेण्यासाठी आलो होतो. यावेळी मुळशी तालुका दुष्काळग्रस्त यादीत समाविष्ट करण्यासह मतदारसंघातील विकासकामांबाबत चर्चा झाली. विलीनीकरणाच्या विषयावर कोणतीही चर्चा झाली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आमदार माऊली कटके आणि चेतन तुपे यांनीही ही केवळ सदिच्छा भेट असल्याचे सांगत विलीनीकरणाचा निर्णय वरिष्ठ नेतेच घेतील, अशी भूमिका मांडली. दरम्यान, मंत्री अदिती तटकरे यांच्या नंदुरबार दौऱ्यात अचानक बदल करण्यात आला. त्या दिवसभर जिल्ह्याच्या दौऱ्यावर राहणार होत्या; मात्र सुधारित कार्यक्रमानुसार दुपारी चार वाजता नंदुरबारहून जळगावला रवाना होऊन तेथून विमानाने मुंबईला जाण्याचे नियोजन करण्यात आले. या दौऱ्यातील बदलामुळे राजकीय चर्चांना आणखी हवा मिळाली. मात्र, पुण्यातील विलीनीकरणाच्या बैठकीसाठी आपल्याला कोणताही फोन किंवा निमंत्रण आले नसल्याचे अदिती तटकरे यांनी स्पष्ट केले. विलीनीकरणाचा निर्णय शरद पवार, सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे आणि दोन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते घेतील. सुनेत्रा पवार जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य असेल, असेही त्यांनी सांगितले. दुसरीकडे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी या चर्चेवर सावध भूमिका घेतली आहे. विलीनीकरणाचा निर्णय घ्यायचा असेल तर दोन्ही बाजूंनी एकत्र बसून सांघिक पद्धतीने चर्चा झाली पाहिजे. एखाद्या बाजूने काही जण चर्चा करतात आणि दुसरी बाजू वेगळी राहते, असे चालणार नाही. सर्वांना विश्वासात घेऊन निर्णय होणे आवश्यक आहे, असे भुजबळ म्हणाले. तसेच शरद पवार यांची भेट घेतली असली तरी विलीनीकरणाबाबत कोणतीही चर्चा झाली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दोन्ही पवार एकत्र आले तर राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना करणाऱ्या जुन्या कार्यकर्त्यांना आनंद होईल, असे मतही भुजबळ यांनी व्यक्त केले. त्यामुळे एका बाजूला आमदारांकडून विलीनीकरणाच्या चर्चेचा इन्कार होत असताना दुसरीकडे वरिष्ठ नेत्यांच्या प्रतिक्रियांमुळे या विषयावरील उत्सुकता वाढली आहे. अद्याप दोन्ही पक्षांकडून विलीनीकरणाबाबत अधिकृत घोषणा झालेली नसली, तरी राष्ट्रवादीतील या घडामोडी आगामी राजकीय समीकरणांच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जात आहेत

राजकीय एकीकरणाचा खेळ! जनतेचे प्रश्न ऐरणीवर

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या पुन्हा एकदा पक्षांच्या विलीनीकरणाच्या चर्चांनी जोर धरला आहे. गेल्या तीन-चार दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाच्या चर्चांना उधाण आले असून, त्यापाठोपाठ दोन्ही शिवसेना एकत्र येणार असल्याच्या बातम्याही राजकीय वर्तुळात रंगू लागल्या आहेत. एकीकडे राज्यातील बहुतांश जिल्ह्यांवर दुष्काळाचे सावट गडद होत आहे, पाण्यासाठी माणसांची आणि जनावरांची भटकंती सुरू आहे, शेतकरी हवालदिल झाला आहे; तर दुसरीकडे राजकीय नेते मात्र कोण कोणासोबत जाणार, कोणाचा पक्ष कोणात विलीन होणार आणि सत्तेच्या सारीपाटावर कोणाची कोणती चाल असणार, याच गणितात गुंतले आहेत. जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांपेक्षा नेत्यांच्या राजकीय अस्तित्वाचा प्रश्न मोठा झाला आहे, हेच महाराष्ट्राचे दुर्दैव! महाराष्ट्राच्या राजकारणात पक्षफुटीचा प्रयोग काही नवीन नाही. २०२३ मध्ये शिवसेनेचे तत्कालीन नेते आणि नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषद निवडणुकीच्या मतदानानंतर आपल्या समर्थक आमदारांसह सुरतमार्गे गुवाहाटी गाठले. सुरुवातीला पंधरा-सोळा आमदारांपासून सुरू झालेल्या या बंडाचे रूपांतर पुढे मोठ्या राजकीय फुटीत झाले. जवळपास चाळीस आमदार आणि काही खासदार उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेपासून वेगळे झाले. त्यानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने पक्षाचे नाव आणि चिन्ह याबाबत निर्णय देताना शिंदे गटाला मूळ शिवसेनेचे नाव आणि चिन्ह दिले. दुसरीकडे, अजित पवार यांनीही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंड करून सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या गटालाही पक्षाचे नाव आणि चिन्ह मिळाले. या दोन्ही निर्णयांविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल असून, अंतिम सुनावणीच्या पार्श्वभूमीवर निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. लोकशाहीत पक्ष कोणाचा, चिन्ह कोणाचे आणि मूळ विचारधारा कोणाची, हा प्रश्न न्यायालयाच्या दारात पोहोचणे हीसुद्धा राजकीय व्यवस्थेची शोकांतिका आहे. दरम्यान, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या २८ जानेवारी रोजी झालेल्या विमान अपघातातील दुर्दैवी निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली. त्यांच्या निधनापूर्वी झालेल्या नगरपरिषद आणि जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्रितपणे निवडणुका लढवल्या होत्या. दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाच्या चर्चा अंतिम टप्प्यात असल्याचे संकेतही अजित पवार यांनी अनेकदा दिले होते. मात्र त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी अशा चर्चांबाबत अनभिज्ञता दर्शवली. त्यामुळे नेमके काय ठरले होते आणि कोणत्या कारणामुळे या चर्चांना पूर्णविराम मिळाला, याबाबत संभ्रम निर्माण झाला. काही दिवसांपूर्वी सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, धनंजय मुंडे आणि दिलीप वळसे-पाटील यांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या भेटीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेमके काय सुरू आहे, याबाबत चर्चांना अधिकच उधाण आले. त्यातच शरद पवार यांच्या प्रकृतीविषयी बातम्या आल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही खा.सुप्रिया सुळे यांच्याशी संपर्क साधून शरद पवार यांच्या प्रकृतीची विचारपूस केल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येणार की शरद पवार भाजपसोबत सत्तेत सहभागी होणार, अशा तर्कवितर्कांना राजकीय वर्तुळात सुरुवात झाली. राष्ट्रवादीच्या चर्चांचा धुरळा खाली बसत नाही तोच दोन्ही शिवसेना एकत्र येण्याच्या चर्चांनी डोके वर काढले आहे. मात्र या चर्चांना किती तथ्य आहे आणि किती राजकीय वातावरणनिर्मिती, हे येणारा काळच ठरवेल. प्रश्न एवढाच आहे की, महाराष्ट्रातील राजकीय पक्षांचे एकत्रीकरण हे विचारधारेच्या आधारावर होणार आहे की सत्तेच्या सोयीसाठी? जनतेने ज्या विचारांवर आणि नेतृत्वावर विश्वास ठेवून मतदान केले, त्या जनादेशाचे काय? निवडणुकीपूर्वी एकमेकांवर आरोपांची राळ उडवायची आणि सत्तेची समीकरणे बदलली की पुन्हा गळ्यात गळे घालायचे, हा कोणता राजकीय आदर्श? आज राज्यातील परिस्थिती अधिक गंभीर आहे. अनेक भागांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. जनावरांना पाणी आणि चारा मिळणे कठीण झाले आहे. शेतकऱ्यांना पिकांचे नुकसान, वाढता उत्पादन खर्च आणि आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. गावोगावी टँकरची प्रतीक्षा आहे. अशा वेळी सत्ताधाऱ्यांनी आणि विरोधकांनी एकत्र येऊन दुष्काळावर मात करण्यासाठी कृती आराखडा तयार करणे अपेक्षित आहे. चारा छावण्या, पाणीपुरवठा, शेतकऱ्यांना आर्थिक मदत आणि रोजगाराची उपलब्धता यावर राजकीय पक्षांनी चर्चा करायला हवी. पण दुर्दैवाने राजकीय पक्षांच्या बैठका जनतेच्या प्रश्नांसाठी कमी आणि सत्तेची गणिते जुळवण्यासाठी अधिक होताना दिसतात. पक्ष एकत्र येतात की फुटतात, हे त्यांच्या अंतर्गत राजकारणाचा भाग असू शकतो; मात्र जनतेच्या प्रश्नांवर त्यांची एकजूट कधी दिसणार? राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या विलीनीकरणाच्या चर्चांनी राजकीय वातावरण तापवण्यापेक्षा दुष्काळाने होरपळणाऱ्या महाराष्ट्राला दिलासा देण्यासाठी राजकीय नेत्यांनी एकत्र यावे, हीच जनतेची अपेक्षा आहे. कारण जनतेला पक्षांचे विलीनीकरण नको, तर प्रश्नांचे निराकरण हवे आहे. सत्तेच्या सारीपाटावर खेळ सुरूच राहतील; पण तहानलेल्या महाराष्ट्राला राजकीय डावपेच नव्हे, तर पाण्याचा घोट हवा आहे!

दयाळूपणा : माणुसकीचा खरा अलंकार

डॉ.राजेंद्र बगाटे

माणसाचे मोठेपण त्याच्या संपत्तीमध्ये, पदामध्ये, अधिकारामध्ये किंवा प्रसिद्धीमध्ये नसून तो इतरांशी किती प्रेमाने, आदराने आणि संवेदनशीलतेने वागतो यामध्ये असते. दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव होणे, त्याच्या अडचणी समजून घेणे, गरजेच्या वेळी मदतीचा हात पुढे करणे आणि कोणत्याही अपेक्षेविना इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे दयाळूपणा होय. हा केवळ वैयक्तिक सद्गुण नसून मानवी नात्यांना जोडणारा, सामाजिक एकोपा वाढविणारा आणि मानवतेला समृद्ध करणारा जीवनमूल्यांचा आधार आहे. आजच्या धावपळीच्या, स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान जीवनात भौतिक प्रगतीबरोबरच माणसाने मनातील संवेदनशीलताही जपली पाहिजे. याच मूल्याची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी १३ नोव्हेंबर रोजी जागतिक दयाळूपणा दिन साजरा केला जातो.



जागतिक दयाळूपणा दिनाची संकल्पना आंतरराष्ट्रीय स्तरावर दयाळूपणाचा प्रसार करणाऱ्या संस्थांच्या प्रयत्नांतून पुढे आली. १९९७ मध्ये जपानमधील टोकियो येथे दयाळूपणासाठी कार्यरत असलेल्या विविध संस्थांचे प्रतिनिधी एकत्र आले. या बैठकीत दयाळूपणाला जागतिक स्तरावर प्रोत्साहन देण्यासाठी व्यापक चळवळ उभी करण्याचा विचार मांडण्यात आला. त्यातून जागतिक दयाळूपणा चळवळीला चालना मिळाली आणि १३ नोव्हेंबर १९९८ रोजी पहिला जागतिक दयाळूपणा दिन साजरा करण्यात आला. पुढे विविध देशांतील संस्था, सामाजिक संघटना, शैक्षणिक संस्था आणि नागरिक या उपक्रमात सहभागी होत गेले. भाषा, धर्म, जात, वंश, संस्कृती आणि राष्ट्रीयत्व अशा अनेक बाबतींत वेगवेगळे असलेले लोक दयाळूपणा या सार्वत्रिक मूल्यामुळे एकत्र येऊ शकतात. परस्परांविषयी आदर, सहानुभूती आणि सहकार्य वाढवून अधिक शांततामय समाज निर्माण करणे, हा या दिनाचा मुख्य उद्देश आहे. दयाळूपणा म्हणजे केवळ एखाद्या गरजू व्यक्तीला आर्थिक मदत करणे किंवा तिच्यावर दया दाखवणे एवढाच मर्यादित अर्थ नाही. दुसऱ्याच्या भावना समजून घेणे, त्याच्या स्वाभिमानाचा आदर करणे, त्याच्या अडचणींकडे संवेदनशीलतेने पाहणे आणि शक्य असेल त्या मार्गाने आधार देणे, ही त्याची व्यापक संकल्पना आहे. एखाद्या व्यक्तीला संकटाच्या वेळी धीर देणे, निराश झालेल्या माणसाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, वृद्ध व्यक्तीला मदत करणे, विद्यार्थ्याला मार्गदर्शन करणे किंवा अनोळखी व्यक्तीशीही सौजन्याने वागणे, या सर्व कृती दयाळूपणाच्याच अभिव्यक्ती आहेत. काही वेळा मोठ्या आर्थिक मदतीपेक्षा प्रेमाचे दोन शब्द किंवा अडचणीच्या काळात सोबत उभे राहणे अधिक मोलाचे ठरते. त्यामुळे दयाळूपणा हा विशेष प्रसंगी व्यक्त करण्याचा गुण नसून दैनंदिन जीवनातील वर्तनाचा अविभाज्य भाग असला पाहिजे.

मानवी समाजाची रचना परस्परावलंबनावर आधारलेली आहे. बालपणापासून वृद्धत्वापर्यंत प्रत्येक टप्प्यावर माणसाला कुटुंब, शेजारी, मित्र, शिक्षक, सहकारी आणि समाजातील इतर घटकांच्या सहकार्याची आवश्यकता असते. या संबंधांचा पाया विश्वास, आपुलकी आणि सहकार्यावर उभा असतो. मात्र, जेव्हा व्यक्ती केवळ स्वतःच्या हिताचा विचार करते आणि इतरांच्या अडचणींकडे दुर्लक्ष करते, तेव्हा सामाजिक नात्यांमधील जिव्हाळा कमी होतो. आर्थिक स्पर्धा, प्रतिष्ठेची चढाओढ, स्वार्थ आणि असहिष्णुता यांमुळे माणसामाणसांमध्ये दुरावा निर्माण होऊ शकतो. दयाळूपणा माणसाला स्वतःच्या गरजांपलीकडे जाऊन इतरांचाही विचार करण्याची शिकवण देतो. दुसऱ्याच्या आनंदात सहभागी होणे आणि त्याच्या दुःखात आधार देणे, यातून समाजातील एकोपा दृढ होतो. विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले आहे. भ्रमणध्वनी, संगणक आणि समाजमाध्यमांमुळे काही क्षणांत जगाच्या कोणत्याही भागातील व्यक्तीशी संवाद साधणे शक्य झाले आहे. मात्र, या तांत्रिक जवळिकीबरोबर भावनिक जवळीक टिकविण्याचे आव्हानही निर्माण झाले आहे. अनेकदा एकाच घरात राहणारी माणसे आपापल्या भ्रमणध्वनीमध्ये व्यस्त असतात. शेजारी राहणाऱ्या व्यक्तीची अडचण माहीत नसते किंवा सार्वजनिक ठिकाणी एखाद्याला मदतीची गरज असली तरी अनेक जण दुर्लक्ष करतात. तंत्रज्ञानाचा वापर केवळ वैयक्तिक सोयीसाठी न करता माणसांना जोडण्यासाठी, मदतीचे जाळे निर्माण करण्यासाठी आणि सकारात्मक विचारांचा प्रसार करण्यासाठी केला पाहिजे. आभासी संवाद महत्त्वाचा असला, तरी प्रत्यक्ष भेट, आपुलकीची विचारपूस आणि सहकार्य यांना पर्याय नाही. आधुनिकतेचा स्वीकार करताना माणुसकीची ऊब हरवू न देणे ही काळाची गरज आहे. दयाळूपणाचे पहिले संस्कार कुटुंबात घडतात. बालक आपल्या आई-वडिलांचे, आजी-आजोबांचे आणि घरातील इतर सदस्यांचे वर्तन पाहून शिकत असते. घरात एकमेकांशी प्रेमाने बोलणे, कामात सहकार्य करणे, अन्नाची नासाडी टाळणे आणि ज्येष्ठांचा आदर करणे या कृती बालकाच्या मनात संवेदनशीलतेची बीजे पेरतात. मुलांना केवळ स्पर्धेत यश मिळविण्याचे किंवा मोठे पद प्राप्त करण्याचे शिक्षण देऊन चालणार नाही, तर चांगला माणूस होण्याचे संस्कारही दिले पाहिजेत. मुलांच्या चुका समजावून सांगताना त्यांचा अपमान न करता संयमाने मार्गदर्शन करणे, हेही दयाळूपणाचे उदाहरण आहे. प्रेम, समता आणि परस्पर आदर असलेले कुटुंबच संवेदनशील समाजाचा पाया घालू शकते.शाळा आणि महाविद्यालये ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची महत्त्वाची केंद्रे आहेत. शिक्षणाचा उद्देश केवळ ज्ञान संपादन करणे, परीक्षा उत्तीर्ण होणे आणि रोजगार मिळविणे एवढाच नसून जबाबदार व संवेदनशील नागरिक घडविणे हाही आहे. विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, सहिष्णुता, समता आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांची जोपासना झाली पाहिजे. वर्गातील एखादा विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे शैक्षणिक साहित्य खरेदी करू शकत नसेल, तर त्याची चेष्टा करण्याऐवजी त्याला मदत करण्याची भावना निर्माण झाली पाहिजे. समाजसेवा, स्वच्छता, वृक्षारोपण, वाचनालयीन सहकार्य आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देणे अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांना दयाळूपणाचा प्रत्यक्ष अनुभव देता येतो. शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी संवेदनशीलतेने संवाद साधला, तर त्यांच्यातही इतरांच्या भावनांचा आदर करण्याची वृत्ती विकसित होते. ज्ञानाबरोबरच माणुसकीचे शिक्षण मिळाले, तर शिक्षणव्यवस्था अधिक अर्थपूर्ण ठरते. भारतीय विचारपरंपरेत करुणा, मैत्री, प्रेम, अहिंसा आणि परोपकार या मूल्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. तथागत गौतम बुद्धांनी करुणा आणि मैत्रीभावाचा संदेश देताना सर्व प्राणिमात्रांविषयी सद्भावना बाळगण्याची शिकवण दिली. दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव करून घेणे आणि ते कमी करण्यासाठी प्रयत्नशील राहणे, ही त्यांच्या विचारांची महत्त्वाची दिशा आहे. बुद्धांचा करुणेचा विचार माणसाला जात, धर्म, भाषा आणि सामाजिक स्थान यांपलीकडे जाऊन समतेने वागण्याची प्रेरणा देतो. भारतीय संतपरंपरेतही दया, प्रेम, परोपकार आणि मानवसेवा यांचा गौरव करण्यात आला आहे. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रिया आणि वंचित घटकांच्या शिक्षणासाठी केलेले कार्य सामाजिक संवेदनशीलतेचे महत्त्वपूर्ण उदाहरण आहे. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायासाठी घेतलेले निर्णय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता व मानवी प्रतिष्ठेसाठी केलेला संघर्ष दुर्बल घटकांविषयीची सामाजिक बांधिलकी अधोरेखित करतो. या विचारांचा खरा अर्थ केवळ सहानुभूती व्यक्त करणे नसून अन्याय दूर करण्यासाठी कृतीशील होणे हा आहे.

समाजातील वृद्ध, दिव्यांग, निराधार महिला, अनाथ मुले, गरीब कुटुंबे आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटक यांच्याशी वागताना दयाळूपणाची खरी कसोटी लागते. या व्यक्तींना केवळ सहानुभूतीची नव्हे, तर सन्मान, सुरक्षितता, समान संधी आणि आवश्यक सुविधांची गरज असते. वृद्ध व्यक्तींच्या अनुभवांचा आदर करणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांना कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्तींना दयेच्या नजरेने पाहण्याऐवजी त्यांच्या क्षमता आणि अधिकारांचा आदर केला पाहिजे. सार्वजनिक इमारती, शैक्षणिक संस्था आणि वाहतूक व्यवस्था सर्वांसाठी सुलभ करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. गरजू महिलांना सुरक्षित वातावरण, मुलांना संरक्षण आणि वंचित घटकांना शिक्षण व रोजगाराच्या समान संधी उपलब्ध करून देणे, हे दयाळूपणाचे सामाजिक रूप आहे. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे, ही जाणीव समाजात रुजली पाहिजे. स्त्री-पुरुष समानता आणि मानवी प्रतिष्ठेच्या दृष्टीनेही दयाळूपणा महत्त्वाचा आहे. स्त्रीच्या मताचा आदर करणे, तिच्या निर्णयस्वातंत्र्याला मान्यता देणे, शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि सुरक्षिततेची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. मुलींना मुलांप्रमाणेच संधी मिळाल्या पाहिजेत. बालविवाह, स्त्रीभेदभाव, कौटुंबिक हिंसा आणि लैंगिक छळ यांसारख्या अन्यायकारक प्रवृत्तींना विरोध करणे ही सामाजिक संवेदनशीलतेची जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे मुलांच्या भावनिक गरजा समजून घेणे, त्यांच्या प्रश्नांना संयमाने उत्तरे देणे आणि त्यांना सुरक्षित वातावरण देणे आवश्यक आहे. दयाळूपणा म्हणजे कोणावर उपकार करणे नव्हे, तर प्रत्येकाला समान माणूस म्हणून स्वीकारणे आणि सन्मान देणे होय.

मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही दयाळूपणाचे महत्त्व मोठे आहे. आज अनेक व्यक्ती ताणतणाव, एकाकीपणा, निराशा, असुरक्षितता आणि भावनिक अस्वस्थता अनुभवत आहेत. बाहेरून आनंदी दिसणाऱ्या व्यक्तीच्या मनातही अनेक प्रश्न आणि वेदना असू शकतात. अशा वेळी तिचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, दोष न देता समजून घेणे आणि आवश्यकतेनुसार योग्य मदत मिळवून देणे महत्त्वाचे ठरते. मानसिक त्रास सहन करणाऱ्या व्यक्तीची चेष्टा करणे किंवा तिला कमकुवत समजणे अयोग्य आहे. मानसिक आरोग्याविषयी मोकळेपणाने बोलण्याचे वातावरण निर्माण झाले पाहिजे. सहानुभूतीपूर्ण संवादामुळे व्यक्तीला आपण एकटे नाही, आपल्याला समजून घेणारी माणसे आहेत, अशी जाणीव होते. त्यामुळे दयाळूपणा हा भावनिक आधार आणि मानसिक स्वास्थ्य वाढविणारा महत्त्वाचा गुण आहे. दयाळूपणाची व्याप्ती माणसांपुरती मर्यादित नाही. प्राणी, पक्षी, वनस्पती आणि निसर्गाविषयी संवेदनशीलता बाळगणेही तितकेच आवश्यक आहे. उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी पाणी ठेवणे, भटक्या प्राण्यांना त्रास न देणे, जखमी प्राण्यांना मदत मिळवून देणे, झाडांचे संरक्षण करणे आणि पाण्याचा अपव्यय टाळणे या कृतींमधून निसर्गाविषयीची काळजी व्यक्त होते. पर्यावरणाचा ऱ्हास, प्रदूषण, पाण्याची टंचाई आणि हवामानातील बदल यांचे परिणाम संपूर्ण मानवजातीला भोगावे लागत आहेत. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. मानवाने निसर्गाचा केवळ उपभोग घेणारा घटक न राहता त्याचे संवर्धन करणारा जबाबदार घटक बनणे आवश्यक आहे.

आपत्ती आणि संकटांच्या काळात दयाळूपणाचे महत्त्व विशेषत्वाने जाणवते. पूर, दुष्काळ, अतिवृष्टी, भूकंप किंवा आग यांसारख्या संकटांमुळे अनेक कुटुंबांचे जीवन विस्कळीत होते. अशा वेळी अन्न, पाणी, कपडे, औषधे आणि निवारा उपलब्ध करून देणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि स्वयंसेवक समाजासाठी मोठा आधार ठरतात. महाराष्ट्रातही विविध भागांत निर्माण झालेल्या संकटांच्या वेळी नागरिक, युवक मंडळे, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक कार्यकर्ते मदतीसाठी पुढे येतात. जात, धर्म, भाषा, प्रदेश किंवा आर्थिक स्थिती यांचा विचार न करता संकटग्रस्तांना मदत करणे हे माणुसकीचे श्रेष्ठ उदाहरण आहे. मदत करताना लाभार्थ्यांच्या स्वाभिमानाचा आदर राखणे आवश्यक आहे. प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता केलेली मदत अधिक अर्थपूर्ण असते. संकट संपल्यानंतरही प्रभावित कुटुंबांना पुनर्वसन, शिक्षण आणि रोजगारासाठी सहकार्य करणे ही दीर्घकालीन सामाजिक जबाबदारी आहे. दयाळूपणाचा संबंध सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेशीही आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात वेगवेगळ्या भाषा, धर्म, जाती आणि संस्कृतींचे लोक एकत्र राहतात. या विविधतेचे सौंदर्य टिकविण्यासाठी परस्परांविषयी आदर, सहिष्णुता आणि बंधुभाव आवश्यक आहे. मतभिन्नता असणे स्वाभाविक आहे; परंतु त्यातून द्वेष किंवा हिंसा निर्माण होऊ नये. दुसऱ्याच्या विचारांचा आदर करणे, वेगळ्या श्रद्धा समजून घेणे आणि मतभेद शांततामय मार्गाने सोडविणे हे दयाळू समाजाचे लक्षण आहे. सार्वजनिक जीवनात सौजन्यपूर्ण भाषा वापरणे, अफवा न पसरवणे आणि कोणत्याही समूहाविषयी पूर्वग्रह न बाळगणे आवश्यक आहे. लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित नसून ती समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि परस्पर आदर या मूल्यांवर आधारलेली आहे. त्यामुळे दयाळूपणा लोकशाही संस्कृतीला बळकटी देतो. समाजमाध्यमांच्या वाढत्या वापरामुळे संवादाची साधने वाढली असली, तरी अपमानास्पद टिप्पणी, वैयक्तिक बदनामी, द्वेषपूर्ण संदेश आणि अफवांचा प्रसार ही गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. आभासी जगात व्यक्त होताना अनेक जण भाषेची मर्यादा विसरतात. एखाद्या व्यक्तीच्या मताशी असहमती असणे म्हणजे तिचा अपमान करण्याचा अधिकार मिळणे नव्हे. समाजमाध्यमांवर सभ्य भाषा वापरणे, खात्री न केलेली माहिती पुढे न पाठवणे, इतरांच्या खासगी आयुष्याचा आदर करणे आणि अडचणीत असलेल्या व्यक्तीची खिल्ली न उडवणे आवश्यक आहे. चुकीच्या माहितीमुळे किंवा अपमानास्पद संदेशामुळे एखाद्याच्या प्रतिष्ठेला आणि मानसिक स्वास्थ्याला धक्का पोहोचू शकतो. त्यामुळे डिजिटल व्यवहारातही दयाळूपणा, विवेक आणि जबाबदारी यांचे पालन झाले पाहिजे.

दयाळूपणा म्हणजे अन्याय सहन करणे किंवा प्रत्येक चुकीच्या कृतीकडे दुर्लक्ष करणे नव्हे. एखाद्या व्यक्तीवर अन्याय होत असेल, तिचे शोषण होत असेल किंवा तिच्या अधिकारांचे उल्लंघन होत असेल, तर त्याविरुद्ध आवाज उठवणेही मानवी संवेदनशीलतेचाच भाग आहे. अन्यायाला पाठिंबा देणे किंवा चुकीच्या कृतीला प्रोत्साहन देणे हा दयाळूपणा ठरत नाही. खरा दयाळूपणा विवेक, न्याय आणि स्वाभिमानाशी जोडलेला असतो. मदत करताना समोरच्या व्यक्तीच्या गरजा समजून घेणे, तिच्या निर्णयस्वातंत्र्याचा आदर करणे आणि तिला स्वावलंबी होण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. योग्य मार्गदर्शन करणे किंवा व्यक्तीला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी सक्षम करणे, हेही दयाळूपणाचेच स्वरूप आहे. दयाळूपणाचा प्रसार करण्यासाठी मोठ्या आर्थिक साधनांची किंवा भव्य उपक्रमांची आवश्यकता नसते. प्रत्येक व्यक्ती आपल्या दैनंदिन जीवनात साध्या कृतींमधून हा गुण जोपासू शकते. घरातील सदस्यांशी प्रेमाने बोलणे, कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांना मदत करणे, सार्वजनिक ठिकाणी शिस्त पाळणे, स्वच्छता राखणे, गरजू विद्यार्थ्याला पुस्तके देणे, रक्तदान करणे, वृद्ध व्यक्तींची विचारपूस करणे आणि आजारी शेजाऱ्याला मदत करणे या कृती समाजात सकारात्मक बदल घडवू शकतात. मदत नेहमी पैशाच्या स्वरूपातच असावी असे नाही. आपला वेळ देणे, कौशल्याचा उपयोग करून देणे, योग्य माहिती पुरवणे किंवा एखाद्याला आत्मविश्वास देणे यांनाही मोठे महत्त्व आहे. दयाळूपणाची कृती किती मोठी आहे यापेक्षा ती किती प्रामाणिक भावनेतून केली आहे, हे अधिक महत्त्वाचे ठरते. जागतिक दयाळूपणा दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा औपचारिक उपक्रम नसून वर्षभर दयाळूपणाची जीवनशैली स्वीकारण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. या निमित्ताने शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी समाजोपयोगी उपक्रम राबवावेत. ज्येष्ठ नागरिकांशी संवाद, रुग्णांना मदत, पर्यावरण संवर्धन, गरजू कुटुंबांना सहाय्य आणि सामाजिक सलोख्याचे कार्यक्रम आयोजित करता येतात. मात्र, या उपक्रमांचे महत्त्व केवळ आयोजनापुरते मर्यादित राहू नये. त्यातून निर्माण झालेली संवेदनशीलता व्यक्तींच्या वर्तनात आणि सामाजिक व्यवहारात दिसली पाहिजे. दयाळूपणाचे संस्कार घरापासून शाळेपर्यंत आणि वैयक्तिक नात्यांपासून सार्वजनिक जीवनापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. आज जगासमोर युद्ध, हिंसाचार, गरिबी, विषमता, विस्थापन, पर्यावरणीय संकटे आणि सामाजिक संघर्ष अशी अनेक आव्हाने आहेत. या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी कायदे, धोरणे, विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक नियोजन यांची आवश्यकता आहेच; परंतु त्याचबरोबर मानवी संवेदनशीलता आणि परस्परांविषयीची बांधिलकीही आवश्यक आहे. केवळ भौतिक प्रगती झाली म्हणून समाज प्रगत होत नाही. समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगता येते का, दुर्बल घटकांना न्याय मिळतो का आणि गरजू व्यक्तीला मदतीचा आधार मिळतो का, यावर समाजाच्या प्रगतीचे खरे मोजमाप अवलंबून असते. दयाळूपणा माणसाला दुसऱ्याच्या वेदनांकडे संवेदनशीलतेने पाहण्याची आणि त्या कमी करण्यासाठी कृती करण्याची प्रेरणा देतो. त्यामुळे शांततामय, समताधिष्ठित आणि मानवतावादी जगाच्या निर्मितीसाठी या मूल्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

माणसाचे खरे मोठेपण त्याने मिळविलेल्या संपत्तीपेक्षा इतरांच्या जीवनात निर्माण केलेल्या आनंदातून आणि दिलेल्या आधारातून व्यक्त होते. दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करणे, निराश मनाला धीर देणे, गरजू व्यक्तीला स्वावलंबी होण्यासाठी मदत करणे आणि प्रत्येकाच्या मानवी प्रतिष्ठेचा आदर करणे, यातच जीवनाचे खरे सार दडलेले आहे. दयाळूपणा हा दुर्बलतेचा नव्हे, तर अंतःकरणातील सामर्थ्याचा परिचय आहे. जागतिक दयाळूपणा दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या वर्तनाचे आत्मपरीक्षण करून दैनंदिन जीवनात अधिक संवेदनशील होण्याचा संकल्प केला पाहिजे. कारण माणुसकीची ओळख मोठ्या घोषणांतून नव्हे, तर छोट्या कृतींतून निर्माण होते. दयाळूपणाची भावना मनात रुजून कृतीत उतरली, तर कुटुंब अधिक प्रेमळ, समाज अधिक सहिष्णू आणि जग अधिक शांततामय होऊ शकेल. म्हणूनच दयाळूपणा हा केवळ एक सद्गुण नसून माणुसकीचा खरा अलंकार आणि सुसंस्कृत समाजाच्या निर्मितीचा भक्कम पाया आहे.

सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप

शासनाच्या उदासिनतेविरोधात कर्मचारी एकत्र

नांदेड/प्रतिनिधी-उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यां प्रमाणे राज्यातील दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा करण्यात यावी,या प्रमुख मागणीसाठी शासनाकडे सर्वप्रकारे रितसर मार्ग अवलंबून देखील तोडगा निघाला नसल्याने अखेर नांदेडसह राज्यातील ४० हजार आजी-माजी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाची हाक दिली आहे. शासन निर्णय जोपर्यंत निर्गमित होणार नाही; तोपर्यंत माघार घेणार नसल्याची माहिती महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने देण्यात आली आहे.

मा.उच्च न्यायालयातील कर्मचारी आणि राज्यातील दुय्यम न्यायालयामध्ये कार्यरत कर्मचारी हे एकाच नाण्याच्या दोन समान बाजू आहेत. २०२३ पर्यंत दोन्ही कर्मचाऱ्यांचे वेतन समान होते परंतु २०२३ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतनश्रेणीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. याच धर्तीवर दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही हाच निर्णय लागू करणे अपेक्षित होत परंतु तसे झाले नाही. शासनाने दोन्ही कर्मचाऱ्यांमध्ये दुजाभाव करुन दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीपासून आजवर वंचित ठेवले आहे असे संघटनेचे म्हणणे आहे.

दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयानेच न्यायमूर्तींची समिती गठित करुन सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव जानेवारी २०२५ मध्येच शासनास सादर केला असतांना देखील शासनाने ही बाब अद्यापही गांर्भीयाने घेतलेली नाही. या संपास महाराष्ट्र राज्य न्यायीक अधिकारी संघ,महाराष्ट्र आणि गोवा बार असोशिएशन,जिल्हा आणि तालुका वकील संघ यांच्यासह राज्यातील बहुसंख्य सर्वपक्षीय आमदार-खासदार यांनी पाठिंबा दिला आहे.

या बेमुदत संपात जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी सक्रीय सहभाग नोंदवणार आहेत. सोबतच आधी जी. आर. मगच माघार असा ठाम निर्धार नांदेड जिल्हा तृतीय श्रेणी न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष नागेश गिरगावकर, सचिव विनोद पाथरकर, लघुलेखक संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी खिंडरे, बेलीफ संघटनेचे जिल्हाध्यक्ष मकबुल शेख यांच्यासह चतुर्थ श्रेणी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मो. फसीओद्दीन सिद्दिकी आदिंनी केला आहे.

रब्बी पिकांसाठी तातडीने कर्ज द्या;राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी!

मुखेड/प्रतिनिधी-रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वेळेत पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुखेड तालुका विधानसभा अध्यक्ष शंकर इंगळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ग्रामीण बँकेत जाऊन बँक व्यवस्थापनाला लेखी निवेदन सादर केले.

सध्या रब्बी हंगामाची तयारी सुरू असून शेतकऱ्यांना बियाणे, खते, औषधे, मशागत आणि पेरणीसाठी मोठ्या आर्थिक भांडवलाची आवश्यकता आहे. मात्र, वेळेत पीककर्ज उपलब्ध झाले नाही तर शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे बँकेने रब्बी हंगामासाठी पीककर्ज वितरणाची प्रक्रिया तातडीने सुरू करून पात्र शेतकऱ्यांना विनाविलंब कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतीच्या हंगामात कर्जासाठी शेतकऱ्यांना बँकेच्या चकरा माराव्या लागू नयेत. कर्ज वितरणातील अडचणी दूर करून शेतकऱ्यांना वेळेत आर्थिक मदत मिळणे गरजेचे आहे, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. रब्बी हंगाम तोंडावर असताना पीककर्जाचा प्रश्न प्रलंबित राहणे ही गंभीर बाब आहे. बँक प्रशासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा शंकर इंगळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा असल्याचा संदेश या निवेदनातून देण्यात आला आहे.

मुन्ना राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या अन्नदान

नांदेड/प्रतिनिधी-शिवसेनेचे उपशहरप्रमुख प्रेमचंद ऊर्फ मुन्ना राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी विविध सामाजिक व अभिष्टचिंतनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.वाढदिवसाचे औचित्य साधून सकाळी १० वाजता रामनगर येथील सुमन बालसुधारगृहात अन्नदान कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला नांदेड उत्तरचे शिवसेनेचे लोकप्रिय आ.बालाजी कल्याणकर आणि शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

भाऊबीजेच्या पर्वावर आ.कोहळीकरांचा स्तुत्य उपक्रम..!

खा.आष्टीकरांच्या अनुपस्थितीची चर्चा

हदगाव/प्रतिनिधी-दिवाळीतील भाऊबीजेच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधून देशाच्या सीमेवर अहोरात्र पहारा देत देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या कुटुंबीयांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हदगाव विधानसभाक्षेत्राचे आ.बाबुराव कदम कोहळीकर यांनी एक स्तुत्य सामाजिक उपक्रम राबविला. शिवसेना नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून आणि आ.कोहळीकर यांच्या पुढाकारातून हदगाव शहरातील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात आजी-माजी भारतीय सैनिकांच्या पत्नी व मातांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

सैनिक देशाच्या रक्षणासाठी सीमेवर तैनात असताना त्यांच्या कुटुंबीयांनाही आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे गरजेचे आहे. त्यांच्या घरातील महिलांच्या हाताला रोजगार मिळावा, त्यांना स्वावलंबनाची संधी उपलब्ध व्हावी आणि कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात भर पडावी, या उदात्त हेतूने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. दिवाळीत भाऊबीजेच्या निमित्ताने लाडक्या बहिणींना भावाकडून स्नेहाची भेट देण्याच्या भावनिक संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे सैनिकांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. केवळ भेटवस्तू देण्यापुरता हा उपक्रम मर्यादित नसून महिला सक्षमीकरण, सामाजिक बांधिलकी आणि देशसेवेसाठी समर्पित सैनिकांच्या कुटुंबीयांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा सामाजिक उपक्रम ठरला. आ.बाबुराव कदम कोहळीकर यांच्या या उपक्रमातून देशाच्या सैनिकांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यासोबतच महिलांना स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



या शानदार कार्यक्रमात राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधून घेणारी बाब म्हणजे हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांची अनुपस्थिती. अलीकडेच शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश केलेले खा. आष्टीकर या कार्यक्रमात उपस्थित नसल्याने राजकीय चर्चांना सुरुवात झाली आहे. विशेष म्हणजे, आ. बाबुराव कदम कोहळीकर यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या परिसरातच खा. नागेश पाटील आष्टीकर यांचे निवासस्थान असल्याची बाबही चर्चेचा विषय ठरली आहे. त्यामुळे सैनिकांच्या कुटुंबीयांच्या सन्मानार्थ आयोजित या कार्यक्रमात विद्यमान खासदारांची अनुपस्थिती अनेकांच्या नजरेत भरली. एकीकडे आ. कोहळीकरांचा सामाजिक उपक्रम कौतुकास पात्र ठरत असताना दुसरीकडे शिवसेने च्या खासदारांच्या अनुपस्थितीची चर्चा हदगाव विधानसभा क्षेत्रात राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

धावत्या रेल्वेतून पडून दोन मजुरांचा दुर्दैवी मृत्यू

योग्य डब्बे बसविण्याची प्रवाशांची मागणी

किनवट/प्रतिनिधी- केवळ कापूस वेचण्यासाठी तेलंगणा राज्यात निघालेल्या हदगाव तालुक्यातील दोन मजूरांचा धावत्या डेम्यू रेल्वेतून खाली पडून जागीच ठार झाल्याची हृदयद्रावक घटना गुरुवारी (१२ नोव्हेंबर) दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली. हिमायतनगर कडून आदिलाबाद कडे जाणाऱ्या रेल्वेतून मदनापूर रेल्वे स्टेशनजवळ पडून हृदयद्रावक आणि अंगावर शहारे उभे करणारा अपघात घडला. हदगाव तालुक्यातील नावा येथील विश्वंभर शंकर देशमुखे (वय वर्ष ३५) आणि बंडू धोंडिबा देशमुखे (वय वर्ष





३५) यांचा मृत्यूमध्ये समावेश असल्याचे गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयातील सूत्रांनी सांगितले.

दिवाळी संपल्यानंतर परतीच्या प्रवासातील प्रवाशांची रेल्वेत चिक्कार गर्दी होती. खचाखच गर्दीमुळे पाय ठेवायला देखील जागा नव्हती, अशातच हे दोघे धक्क्याने धावत्या गाडीतून खाली पडले आणि रेल्वेने चिरडल्या गेले. दरम्यान त्यांना तातडीने किनवट रेल्वे स्थानकावर आणून दुपारी १:२० वाजताचे दरम्यान गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले मात्र त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉ.आश्विन बोमक्कँटीवार यांनी सांगितले. या दुर्घटनेमुळे संतप्त प्रवाशांनी डेम्यू रेल्वेच्या अयोग्य कोच व्यवस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली असून, तातडीने योग्य डबे बसवण्याची मागणी केली आहे. अशा समस्यांबाबत किनवटकरांनी रेल्वे प्रशासनाकडे वारंवार मागण्या करुनही प्रशासनाचा प्रतिसाद मिळत असल्यामुळे अनेकांनी तीव्र नाराजी व्यक्त केलीय. डेम्यू कोच ऐवजी योग्य डबे असते तर ही ऱ्हदयद्रावक घटना घडली नसती, आतातरी रेल्वे प्रशासन यातून बोध घेऊन सुधारणा करणार का? असा प्रवाशांचा सवाल आहे.

दीपावलीच्या मुहूर्तावर दर्शनास प्रारंभ

राहेरच्या योग्या नृसिंह मंदिराचे भाविकांसाठी दरवाजे खुले

नांदेड/प्रतिनिधी-ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरेचा वारसा लाभलेल्या राहेर येथील जवळपास ४०० वर्षांपासून बंद अवस्थेत असलेल्या श्री योग्या नृसिंह मंदिराचे काम अखेर पूर्णत्वास आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून तब्बल २८ कोटी रुपये खर्च करून या भव्य मंदिराची उभारणी करण्यात आली असून, दीपावलीच्या शुभमुहूर्तावर मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात आले आहे. अनेक शतकांनंतर या ऐतिहासिक धार्मिक स्थळाचे दरवाजे भाविकांसाठी खुले झाल्याने राहेरसह परिसरातील भाविकांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



राहेर गावाला नृसिंह स्वामींच्या चार स्थानांचा विशेष धार्मिक आणि ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. येथे आग्या नृसिंह, भोग्या नृसिंह, योग्या नृसिंह आणि खडका नृसिंह अशी एकूण चार नृसिंह स्थाने आहेत. या चारही स्थानांना धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. मात्र, यापैकी योग्या नृसिंह मंदिर अनेक वर्षांपासून बंद व दुर्लक्षित अवस्थेत होते. जवळपास चार शतकांनंतर या मंदिराचे काम पूर्ण होऊन भाविकांना पुन्हा दर्शनाची संधी उपलब्ध झाली आहे. मंदिराचे काम पूर्ण झाल्यानंतर वेदशास्त्रसंपन्न वेदांत महाराज जोशी यांच्या शुभहस्ते विधिवत महापूजा व अभिषेक करण्यात आली.

CHANGE IN NAME

My (old name) is **RIZWANI PRADEEP NARAYANRAO** which now I am, changing as (new name) **PRADEEP NARAYANDAS RIZWANI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
PRADEEP NARAYANDAS RIZWANI
R/o Maya niwas, H.no.1-12-704, Plot no.37
Bhagya nagar Nanded-431605
Mob.no. 9422171955

CHANGE IN NAME

My (old name) is **SAJIDA BEGUM SHAIK IBRAHIM** which now I am, changing as (new name) **SAJIDA BEGUM MOHAMMAD SHAKEEL AHMED**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
SAJIDA BEGUM MOHAMMAD SHAKEEL AHMED
R/o 1-4-95, Maqdum nagar, galli no.4,
near Floor Mill Nanded-431602
Mob.no. 9323626541

CHANGE IN NAME

My (old name) is **NARAYANRAO RIZWANI** which now I am, changing as (new name) **NARAYANDAS NAVALRAI RIZWANI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
NARAYANDAS NAVALRAI RIZWANI
R/o Maya niwas, H.no.1-12-704, Plot no.37
Bhagya nagar Nanded-431605
Mob.no. 9422171955



नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने दिवाळी पाडव्या निमित्त आयोजित पान-सुपारी कार्यक्रमाला माजी मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. यावेळी माजी मंत्री डी.पी.सावंत, आ.बालाजी कल्याणकर, आ.अमरनाथ राजूरकर, माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, सभापती संजय देशमुख लहानकर, उपसभापती भुजंग पाटील डक, गोविंदराव शिंदे नागेलीकर, निलेश देशमुख, गजानन कदम, पिंटू पाटील शिंदे यांच्यासह व्यापारी, शेतकरी उपस्थित होते. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

नांदेड ते श्रीक्षेत्र येहळेगाव दशम पायी दिंडी सोहळा

नांदेड/प्रतिनिधी-परमपूज्य सद्गुरू श्री माधवानंद महाराज यांच्या कृपाशीर्वादाने, प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही कार्तिकी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त दि. १७ ते २० नोव्हेंबर दरम्यान, नांदेड ते श्रीक्षेत्र येहळेगाव या पवित्र मार्गावर भव्य पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यंदा या पवित्र दिंडी सोहळ्याचे १० वे वर्ष आहे. चार दिवसीय पायी वारी आहे. वारी म्हणजे केवळ पायी चालणे नव्हे, तर ती आहे श्रद्धेची वाट, भक्तीचा प्रवास आणि सद्गुरूंच्या चरणी समर्पित होण्याची अनमोल अनुभूती! या पवित्र सोहळ्यात सहभागी होऊन 'याची देही, याची डोळा' भक्तिरसाचा अविस्मरणीय अनुभव घेण्याची ही मंगल संधी आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी या भक्तिमय सोहळ्यात सहभागी होऊन दिंडीची शोभा वाढवावी व सद्गुरूंच्या कृपाशीर्वादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. दिंडीच्या पदयात्रेसंबंधी सविस्तर माहितीसाठी रमेश राजुरकर, दुर्गादास राखे, सतीश देशमुख, अमोल कँडारकर यांच्याशी संपर्क साधावा, कळविण्यात आले आहे.

डॉ.आंबेडकर सामाजिक प्रेरणा पुरस्कारासाठी नगरसेवक सत्यपाल सावंत यांची निवड

नांदेड/प्रतिनिधी- भारतीय संविधान दिनाच्या औचित्याने बी.आर. फाउंडेशन, नांदेड यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या यशोधरा गौरव सोहळ्यामध्ये छत्रपती शिवाजीनगर प्रभाग क्रमांक ८ चे नगरसेवक सत्यपाल सावंत यांची प्रतिष्ठेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक प्रेरणा पुरस्कारासाठी एकमताने निवड करण्यात आली आहे.

आंबेडकरी विचारधारा आणि चळवळ अधिक गतिमान व मजबूत करण्यासाठी तसेच सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी केलेले कार्य,



सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रातील योगदान व सामाजिक बांधिलकीची दखल घेऊन बी.आर. फाउंडेशन आणि सोहळा संयोजन समितीने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली आहे. या पुरस्काराचे स्वरूप मानचिन्ह, मानपत्र, भारतीय संविधानाची प्रत आणि शाल असे असून, शनिवार, दि २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता, कुसुम सभागृह, नांदेड येथे मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. नगरसेवक सत्यपाल सावंत यांची या पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल विविध सामाजिक, राजकीय व आंबेडकरी चळवळीतील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे. सामाजिक कार्याची दखल घेत मिळालेला हा सन्मान प्रभागातील नागरिकांसाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

मंत्री संजय शिरसाट यांच्या घरावर मध्यरात्री दगडफेक

छत्रपती संभाजीनगरात खळबळ;तीन तरुणांना अटक

छत्रपती संभाजीनगर : राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या गोलवाडी परिसरातील निवासस्थानी गुरुवारी मध्यरात्री अज्ञात तरुणांनी दगडफेक करून काचेच्या बाटल्या भिरकावल्याची धक्कादायक घटना घडली. रात्री साडेबारा वाजेच्या सुमारास घडलेल्या या प्रकारामुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तीन तरुणांना ताब्यात घेऊन अटक केली असून संशयितांना पकडण्याच्या प्रयत्नात दोन पोलीस कर्मचारी किरकोळ जखमी झाले आहेत.



तीन तरुणांनी शिरसाट यांच्या निवासस्थानाच्या दिशेने दगड आणि काचेच्या बाटल्या फेकून गोंधळ घातला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तिन्ही तरुणांना ताब्यात घेतले. याप्रकरणी सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर संजय शिरसाट यांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. पोलीस आयुक्तांचा फोन बंद होता, तसेच एकही वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी पोहोचला नसल्याची तक्रार त्यांनी केली. पालकमंत्र्यांच्या घरावर हल्ला होत असताना पोलिसांनी तातडीने दखल घेणे अपेक्षित होते, अशा शब्दांत त्यांनी नाराजी व्यक्त केली. यानंतर राज्याच्या पोलीस महासंचालकांनी फोनवरून संपर्क साधून योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याचे शिरसाट यांनी सांगितले. दरम्यान, पोलीस उपायुक्त रत्नाकर नवले यांनी या प्रकरणाची माहिती देताना सांगितले की, पोलिसांना आपत्कालीन क्रमांक ११२ वर माहिती मिळाल्यानंतर अवघ्या चार ते पाच मिनिटांत पोलीस वाहन घटनास्थळी पोहोचले. तिन्ही तरुणांना ताब्यात घेऊन कायदेशीर कारवाई करण्यात आली. प्राथमिक तपासात त्यापैकी दोघांचे एमएस्सी, तर एकाचे बीकॉम शिक्षण झाल्याचे समोर आले आहे. तिघांचीही आतापर्यंत कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी आढळलेली नाही. या घटनेमागील नेमके कारण शोधण्यासाठी पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. पालकमंत्र्यांच्या निवासस्थानावरच मध्यरात्री दगडफेक झाल्याने शहराच्या सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

एखाद्याच्या आयुष्यात आनंदाचा दिवा हाच खरा आनंद-खा.गोपछडे



देगलूर/प्रतिनिधी-दिवाळी हा केवळ दिव्यांचा आणि रोषणाईचा सण नाही, तर माणुसकी, आपुलकी आणि संवेदनशीलतेची जाणीव करून देणारा उत्सव आहे. आपल्या आनंदात समाजातील प्रत्येक घटकाला सहभागी करून घेणे, हीच दिवाळीची खरी शिकवण आहे.

याच भावनेतून आज देगलूर तालुक्यातील करडखेड येथील गरीब शेतकरी कुटुंबातील श्री. दशरथ नागोराव गाडे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्यासोबत दिवाळीचा सण साजरा केला. त्यांच्या कुटुंबीयांसोबत आनंदाचे क्षण साजरी केले, एकत्र जेवण केले आणि आपुलकीच्या गप्पांमधून त्यांच्या सुख-दुःखात सहभागी झालो. त्यांच्या घरातील साधेपणा, मनातील प्रेम आणि पाहुणचारातील आपुलकी अनुभवताना मनाला एक वेगळेच समाधान लाभले. यावेळी गोमातेचे पूजन करून भारतीय संस्कृतीतील श्रद्धा आणि परंपरेचे जतन केले. याप्रसंगी माधवरावजी मिसाळे गुरुजी, प्रकाश पाटील बेंबरेकर, व्यंकटराव किडे पाटील, शंकर पाटील सावळीकर, अशोक साखरे, संतोष पाटील, शिवाजी पाटील उच्चेकर, बसवंत गोपछडे, युवराज उच्चेकर, रुपेश पाटील भोकसखेडकर, बालाजी ईबितवार, यादवराव गाडे, सुनिल पाटील शिंदे, व्यंकट रुपनर, शहाजी गाडे, संतोष गाडे, सुरेश गाडे, ओमकार गाडे, चंद्रकांत गाडे, सिध्देश्वर वाघमारे, अंतेश्वर वाघमारे, शहाजी नामपल्ले, सुभाष तोटरे, यांच्यासह गावातील नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

मुदखेड येथे महिलांसाठी शौचालय सुरु करण्याची मागणी

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड शहरात सार्वजनिक शौचालयाची मागणी अनेक दिवसांपासून होत होती. अखेर नगरपरिषदेच्या वतीने नगरपरिषद कॉम्प्लेक्ससमोर, नव्याने बांधण्यात आलेल्या सार्वजनिक शौचालयाचे उद्घाटन करण्यात आले. मात्र, महिला भगिनींसाठी शोचालय सुविधांचा विचार करण्यात आला नाही, असा सवाल उपस्थित करत काँग्रेस पक्षाच्या एका कार्यकर्त्याने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

अण्णाभाऊ साठे शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या बाजूला सार्वजनिक शौचालय बाध न्यान आले आहे परंतु तेसुरु करण्यात आले नाही ग्रामीण भागातून विविध कामांसाठी मुदखेड शहरात येणाऱ्या महिला भगिनींसाठी शहरात शौचालय नसल्याने गैरसोय होत आहे भोकरच्या आ.श्रीजया अशोकराव चव्हाण यांच्या मतदारसंघातील मुदखेड शहरात शौचालय नसल्याने महिलांच्या सोयीसाठी आमदारांनी लक्ष द्यावे अशी मागणी परिसरातील नागरिकांतून केल्या जात आहे याकडे लोकप्रतिनिधी व नगरपालिका प्रशासनाने लक्ष देऊन महिलासाठी शौचालयाची व्यवस्था करावी अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने गिरीश कोत्तावार यांनी केली आहे.

धर्माबादमध्ये ऐन दिवाळीत कचऱ्याचे ढिगारे

न.प.च्या स्वच्छतेचा बोजवारा!

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद नगर परिषदेच्या स्वच्छता व्यवस्थेचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे चित्र छत्रपती शिवाजी नगर परिसरात पाहायला मिळत आहे. दिवाळीचा सण उलटून चार दिवस झाले, तरी नगर परिषदेची घंटागाडी परिसरात फिरकली नसल्याने नागरिकांना कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमध्ये राहण्याची वेळ आली आहे. एकीकडे स्वच्छतेच्या घोषणा आणि स्वच्छ भारत अभियानाचा गाजावाजा केला जात असताना दुसरीकडे शहरातील नागरिकांना मात्र अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे. घरांसमोर, रस्त्यांवर आणि नाल्यांच्या परिसरात कचऱ्याचे ढीग साचले आहेत. दिवाळीतील फराळाचे अवशेष, फटाक्यांचा कचरा आणि प्लास्टिक सर्वत्र पसरले असून दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. डास, माशा, भटकी कुत्री आणि डुकरांचा वावर वाढल्याने लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

नगर परिषद प्रशासनाकडून घंटागाडी नियमित पाठवली जात नसेल, तर स्वच्छतेच्या दाव्यांचा उपयोग काय? नागरिक नियमित कर भरतात, मग त्यांना मूलभूत स्वच्छता सुविधा मिळणार नाहीत का? सणासुदीच्या काळातही कचरा उचलण्याची व्यवस्था कोलमडत



असेल, तर संबंधित यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष डॉ. टी. एस. पठाण यांनी नगर परिषद धर्माबादच्या मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदन देऊन प्रशासनाला जाब विचारला आहे. छत्रपती शिवाजी नगरमधील सर्व साचलेला कचरा तात्काळ उचलण्यात यावा, संपूर्ण परिसरात जंतुनाशक फवारणी व आवश्यकतेनुसार फॉगिंग करण्यात यावे, घंटागाडी नियमित व ठरलेल्या वेळेत सुरू ठेवण्याची लेखी हमी द्यावी, चार दिवस घंटागाडी का आली नाही परिसर आणि आरोग्यदायी वातावरण मिळणे ही कोणाची मेहरबानी नसून प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे मुख्याधिकारी आणि नगर परिषद प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी शिवाजी नगरमधील नागरिकांची मागणी आहे., याची चौकशी करून संबंधित ठेकेदार, कर्मचारी किंवा मुकादम यांच्यावर नियमानुसार कारवाई करावी, केलेल्या कारवाईचा अहवाल तीन दिवसांत लेखी द्यावा.दोन दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास छत्रपती शिवाजी नगरमधील नागरिकांना सोबत घेऊन नगर परिषद कार्यालयासमोर शांततामय आंदोलन करण्यात येईल, तसेच हे प्रकरण जिल्हाधिकारी नांदेड आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे पाठविण्याचा इशारा डॉ. टी. एस. पठाण यांनी दिला आहे. धर्माबाद नगर परिषद प्रशासन जागे होणार की नागरिकांना घाणीच्या साम्राज्यातच राहावे लागणार? नागरिकांना स्वच्छ रस्ते, स्वच्छ परिसर आणि आरोग्यदायी वातावरण मिळणे ही कोणाची मेहरबानी नसून प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे मुख्याधिकारी आणि नगर परिषद प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी छत्रपती शिवाजी नगरमधील नागरिकांची मागणी आहे.

वळगमध्ये दिवाळी निमित्त गरजू कुटुंबांना फराळ व वस्त्र वाटप

संग्राम सेनेचा मानवतेचा संदेश

देगलूर/प्रतिनिधी-दिवाळी म्हणजे आनंद, दिवाळी म्हणजे प्रकाश, दिवाळी म्हणजे एकमेकांच्या आनंदात सहभागी होणे. याच भावनेतून देगलूर तालुक्यातील वळग गावात यंदाची दिवाळी गरजू कुटुंबांसाठी खऱ्या अर्थाने गोड झाली. अखिल भारतीय हिंदू संग्राम सेना जिल्हा दक्षिण नांदेड, तेलंगणा उपपीठ यांच्या वतीने दिवाळीच्या पावन पर्व निमित्त सामाजिक बांधिलकी जपत दिवाळी फराळ व वस्त्र वाटप कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले.

अनंत श्री जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी प्रभू यांच्या कृपा आशीर्वादाने व परमपूज्य कानिफनाथ महाराज यांच्या प्रेरणेने हा सेवाकार्याचा उपक्रम पार पडला. केवळ निवडक कुटुंबेच नव्हे, तर कार्यक्रमासाठी आलेल्या इतर सर्व भाविकांनाही फराळाचे पाकीट देऊन सन्मान करण्यात आला. त्यामुळे गावात कुणीही उपाशी, कुणीही वंचित राहिले नाही, अशी भावना निर्माण झाली. फराळाचे पाकीट व नवीन साडी हातात पडताच अनेक महिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. आमच्यासाठी ही दिवाळी खास झाली. आम्हाला कुणीतरी आठवले, आमच्या आनंदात सहभागी झाले, यापेक्षा मोठे सुख कोणते? अशा भावना लाभार्थी महिलांनी व्यक्त केल्या. लहान मुलांच्या चेहऱ्यावरही फराळ मिळाल्याचा आनंद स्पष्ट दिसत होता. या कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित नागरिक व प्रा.गोपाळ मोरे पाटील,



श्री.साहेबराव गज्जलवार सर यांच्यासह पिठाचे मा.लेफ्टनंट जनरल गंगाराम मारेपली साहेब, नवनिर्वाचित लेफ्टनंट जनरल वामनराव माने साहेब व ट्रेनर नरशिंग सलगरे साहेब उपस्थित होते. याशिवाय दक्षिण नांदेड जिल्हा कर्नल दत्तात्रय बेंजलवार, तालुका कॅप्टन बालाजी गोटेवाड, तालुका युवा अध्यक्ष शुभम बचिपले, गुंगे पाटील, साई कावटवार, चंद्रकांत गज्जलवार, गंगाधर गज्जलवार, मीराबाई गज्जलवार, श्यामाबाई गज्जलवार, संजय शरीरवाड, सर्व मेजर सुभेदार आणि सर्व संग्राम सैनिक उपस्थित होते. या सेवा कार्यासाठी एकूण २५ जणांची उपस्थिती लाभली.

जाहूर नगरीत विविध क्षेत्रांतील गुणीजनांचा गौरव

मुखेड/प्रतिनिधी-ज्ञानज्योती बहुद्देशीय सेवाभावी संस्था, जाहूर आणि मानव्य विकास बहुद्देशीय सेवाभावी संस्था, जाहूर यांच्या संयुक्त विद्यमाने जाहूर नगरीत दिवाळी भेट या विशेष कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून शैक्षणिक, प्रशासकीय तसेच सामाजिक आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

सन २०२६ मध्ये इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच प्रशासकीय सेवेत कार्यरत अधिकारी, कर्मचारी आणि विविध क्षेत्रांत आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या गुणीजनांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात सन्माननीय अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे श्री. हरिश्चंद्र आत्माराम पाटील यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. गावातील गुणवंत विद्यार्थी, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा एकाच व्यासपीठावर सन्मान झाल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या सोहळ्याला जाहूर गावातील मोठ्या संख्येने ग्रामस्थ, नागरिक, विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रकांत दामेकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रकाश नामदेवराव हिवराळे आणि ब्रह्माजी विठ्ठल बोडके यांनी प्रभावीपणे केले. तर ज्ञानज्योती बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा प्रा. डॉ. ज्योती प्रकाश हिवराळे यांनी आभार प्रदर्शन केले. गुणवंतांचा सन्मान, कर्तृत्वाचा गौरव आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा हा दिवाळी भेट कार्यक्रम जाहूर नगरीच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील एक प्रेरणादायी उपक्रम ठरला.

जायकवाडीतून मराठवाड्यासाठी पाणी सोडले!

९ नोव्हेंबरपासून डाव्या कालव्यातून प्रत्यक्ष विसर्ग सुरु

छत्रपती संभाजीनगर-राज्यात यंदा पावसाने दडी मारल्याने दुष्काळाचे संकट अधिक गडद झाले आहे. राज्य सरकारने ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला असून मराठवाड्यात पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. अशा परिस्थितीत जायकवाडी धरणातून डाव्या आणि उजव्या कालव्यात पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आल्याने मराठवाड्याला काहीसा दिलासा मिळाला आहे.

जायकवाडी धरणाच्या कालवा सल्लागार समितीच्या २ नोव्हेंबर रोजी झालेल्या बैठकीत रब्बी हंगामासाठी पहिले आवर्तन सोडण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार ५ नोव्हेंबरपासून दोन्ही कालव्यांतून पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आले. दरम्यान, ९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून डाव्या कालव्यातून प्रत्यक्ष पाणी सोडण्यास सुरुवात झाली. सुरुवातीला ३०० क्युसेक विसर्गाचे नियोजन करण्यात आले होते. यंदा अपेक्षित पाऊस न झाल्याने जलसाठ्यांमध्ये घट झाली आहे. परिणामी, अनेक भागांत पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. शेतीसाठी पाणी उपलब्ध नसल्याने रब्बी हंगामातील पिकांचे भवितव्यही धोक्यात आले आहे. जनावरांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था करणे हे प्रशासनापुढील मोठे आव्हान बनले आहे. या पार्श्वभूमीवर जायकवाडीच्या कालव्यांमधून सोडण्यात येणारे पाणी शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. विशेषतः रब्बी हंगामातील पिकांना या पाण्याचा आधार मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र, दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करणे आवश्यक आहे.

दुष्काळाच्या संकटात जायकवाडीचे पाणी मराठवाड्यासाठी दिलासादायक ठरत असले, तरी पिण्याचे पाणी, शेती आणि पशुधनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध करून देण्याचे आव्हान कायम आहे.

व्यावसायिक शिक्षण संस्थांच्या प्रवेश,शुल्क नियमांत बदल होणार?

कायद्यातील सुधारणांसाठी राज्य सरकारकडून समिती गठीत

मुंबई/प्रतिनिधी- राज्यातील व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश प्रक्रिया आणि शुल्क नियंत्रणासंदर्भातील नियमांमध्ये महत्त्वपूर्ण बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) आणि विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्काचे विनियमन) अधिनियम, २०१५ मध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला आहे.

तंत्रशिक्षण संचालनालय, प्रवेश नियामक प्राधिकरण आणि शुल्क नियामक प्राधिकरण यांनी २०१५ च्या अधिनियमात आवश्यक सुधारणा करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर केले होते. या प्रस्तावांचा सर्वंकष अभ्यास करून सुधारित अधिनियम आणि नियमांचा मसुदा तयार करण्यासाठी शासनाने सात सदस्यीय समिती स्थापन केली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त प्रधान सचिव श्री. राजेंद्र भागवत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समितीमध्ये शुल्क नियामक प्राधिकरणाचे सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरणाचे सचिव तथा राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त, उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक, निवृत्त विधी सल्लागार डी. पी. गोमारे, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे उपसचिव (तंत्रशिक्षण) आणि तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक यांचा समावेश आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक हे समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत. २०१५ च्या अधिनियमातील तंत्रशिक्षण संचालनालय, प्रवेश नियामक प्राधिकरण आणि शुल्क नियामक प्राधिकरण यांनी सुचविलेल्या सुधारणांचा तसेच अन्य संबंधित तरतुदींचा सर्वसमावेशक अभ्यास करणे, ही समितीची प्रमुख जबाबदारी असेल. त्यानंतर आवश्यक शिफारशींसह सुधारित अधिनियम आणि नियमांचा मसुदा तयार करून शासनाला सादर करावा लागणार आहे.

पान १ वरुन

नांदेडमध्ये दोन ठिकाणी...

आणि मोबाईल चार्जर असा एकूण १५ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने काढून घेतला. या प्रकरणी धनेगाव, देवठाणा, सुमेधनगर, भोकर, पोटा बुद्रुक, नांदला आदी ठिकाणच्या रहिवाशांसह एका विधिसंघर्षग्रस्त बालकाचा सहभाग असल्याचे पोलीस प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. फिर्यादी कृष्णा भाकर कदम (वय २१, रा. धनेगाव, नांदेड) यांच्या तक्रारीवरून विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपींवर अटकेची कारवाई करण्यात आली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देशपांडे करीत आहेत. शहरात एकापाठोपाठ घडलेल्या घरफोडी आणि लुटमारीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. घर बंद ठेवून बाहेर जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याची गरज निर्माण झाली आहे. दरम्यान, या तिन्ही प्रकरणांचा पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्यांकडून सुरू आहे.

राहुल गांधींचा मोदी सरकारवर...

यांनीही फोन टॅपिंगचा आरोप केल्याने या प्रकरणाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. एकीकडे भाजपकडून काँग्रेसच्या आंदोलनांमागे परकीय शक्ती असल्याचे आरोप केले जात असताना दुसरीकडे काँग्रेसनेच केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. या आरोपांवर केंद्र सरकारची अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नसून, आगामी काळात या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४